# बृहत् पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाची वाटचाल ....

— डॉ. अरुण जतकर, मन्रोविल्, पेन्सिल्वेनिया

१९८६ सालाच्या जुलैमधे आम्ही न्यू यॉर्क प्रांतातील 'मन्रो' नांवाच्या गांवातून पिट्स्बर्गच्या 'मन्रोविल्' या उपनगरात स्थलांतर केले. पिट्स्बर्गमधे अधिकृत महाराष्ट्र मंडळ कसे काय नाही हा प्रश्न तेव्हांपासून मनात वारंवार येऊ लागला.

मन्रोपासून सुमारे ६०-७० मैल अंतरावरील न्यू यॉर्क शहरात महाराष्ट्र मंडळ होते. त्याचे आम्ही सभासद होतो आणि शक्यतो महाराष्ट्र मंडळाचा एकही कार्यक्रम चुकवायचा नाही असा आमचा नियम होता. एकदा एक कार्यक्रम जानेवारी की फेब्रुवारी महिन्यात होता आणि आम्ही घरी यायला निघालो तेव्हा संध्याकाळचे आठ-साडेआठ वाजून गेले होते. गाडीत आमच्याबरोबर आमची दोन मुलेही होती — चार वर्षांची तेजस आणि अडीच वर्षांचा श्रेयस. न्यू यॉर्क शहरातून बाहेर पडण्यासाठी 'जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिज'ला लागेपर्यंत जोरदार हिमवृष्टी सुरू झाली. 'न्यू यॉर्क थ्रू वे' या राजमार्गाने हळुहळू गाडी चालवीत घरी पोहोचेपर्यंत पहाटेचे दोन वाजले !

मराठी माणसांचे कमालीचे दुर्भिक्ष्य असलेल्या मन्रोसारख्या गांवी रहात असल्याने न्यू यॉर्कच्या महाराष्ट्र मंडळावर एवढी भक्ती जडली होती. त्यामुळे पिट्स्बर्गमधे बरीच मराठी कुटुंबे असूनही इथे अधिकृत महाराष्ट्र मंडळ नसावे याचे आम्हाला आश्चर्य वाटणे साहजिक होते.

पिट्स्बर्गमधे मराठी लोकांची वस्ती गेल्या शतकाच्या साठीपासून आहे. १९६५च्या सुमारास जोशी (मनोहर आणि शुभा), विचारे, फणसे, दीक्षित (बळवंत आणि विद्या), चौधरी, पाटील (उल्हास आणि सुजाता), कुलकर्णी, फडके, ऋषि, पियर्स, केंकरे (श्रीकृष्ण आणि अनसूया), धर्माधिकारी, शेटे, अशी कुटुंबे पिट्स्बर्गमधे होती. पुढे देवरस, भडसावळे, घाटे, तेरेदेसाई, फाटक, कार, कोतवाल, अथणी, पालेकर, गांधी, पाटील (बाळ आणि वैशाली), केंकरे (सुंदर आणि वंदना), वर्टी, करंबेळकर, सांपळे, वगैरे मंडळी पिट्स्बर्गमधे येऊन स्थायिक झाली. युनियन टाउनमधील दीक्षित (निरंजन आणि सुधा), आणि जोशी (किशोर आणि उषा), स्लिपरी रॉक्मधील जोशी (शरद आणि आशा), ग्रोव सिटीमधील सावर्डेकर, ईस्ट लिव्हरपूल (ओहायो) येथील परूळकर आणि समरसेटमधील घाटगे ही मंडळीही पिट्स्बर्गच्या वाढत्या मराठी समाजाचे घटक झाली. त्यापुढील लाटेबरोबर मुजुमदार, घाटणेकर, जतकर, साळकर, दिघे, थत्ते, भेंडे, वगैरे मंडळी पिट्स्बर्गमधे आली.

एका वर्षी 'पिकनिक'च्या दिवशी मुसळधार पाऊस आल्यामुळे सगळ्यांनी डॉ. नारायण व डॉ. नीला चौधरी यांच्या गराजमधे बसून 'पिकनिक'ची मौज कशी अनुभवली हा किस्सा पिट्स्बर्गमधील 'जुन्या' लोकांकडूनच ऐकावा. दिवाळीच्या चारपैकी एका दिवशी शुभाताई जोशींच्या घरी बरीच मराठी मंडळी जमून दिवाळी साजरी करीत असत. पिट्स्बर्गमधील मराठी मंडळी एकत्र येऊन गणेशचतुर्थीही साजरी करीत असत. पण या कार्यक्रमांना अधिकृत महाराष्ट्र मंडळाचे छत्र नव्हते.

पिट्स्बर्गमधे अधिकृत मराठी मंडळ असावे ही कल्पना इथे अनेकांच्या मनात रटरटत असावी. पिट्स्बर्गच्या परिसरात स्थायिक झालेल्या मराठी कुटुंबांची आणि पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी भारतातून आलेल्या मराठी विद्यार्थ्यांची संख्या १९८६ साली नजरेत भरण्याजोगी होती. त्या वर्षी दिवाळीच्या सार्वजनिक कार्यक्रमासाठी दीपक कोतवालने पिट्स्बर्गमधील सर्व मराठी मंडळींना जे पत्र पाठवले, त्या पत्रात अधिकृत महाराष्ट्र मंडळ स्थापन करण्याची संकल्पना त्याने मांडली.

१९८६च्या दिवाळीला बरीच गर्दी होती. अधिकृत महाराष्ट्र मंडळ स्थापन करण्याच्या संकल्पनेला सर्वांनी निर्विवाद अनुमोदन दिले. मन्रोविल्मधे राहणारे उल्हास पाटील मंडळाचे पहिले अध्यक्ष झाले; पण एकदोन महिन्यातच त्यांची टेक्ससमधे बदली झाली. तेव्हा डॉ. अलका पालेकर यांनी अध्यक्षपद स्वीकारले.

पेन्सिल्वेनिया राज्यसरकारात पिट्स्बर्गच्या महाराष्ट्र मंडळाची रीतसर नोंदणी करण्यासाठी 'घटना' (Constitution) तयार करणे आवश्यक होते. ते काम दीपकने धडाडीने सुरू केले. पुढे मीही त्याच्याबरोबर घटना लिहिण्याच्या कामात सहभागी झालो. ग्रँट स्ट्रीटवरील यू.एस. स्टील कंपनीच्या साठमजली इमारतीत मेलन बँकेची जी मुख्य कचेरी

(Head Office) होती, तिथे दीपक त्या वेळी काम करीत असे. काही रात्री दीपकने आणि मी त्याच्या ऑफिसमधे बसून मंडळाच्या घटनेचा मसुदा कम्प्यूटरवर टाइप करण्याचे काम केले. मसुदा जेव्हा पुरा झाला, तेव्हा पेन्सिल्वेनिया राज्यसरकारात मंडळाची अधिकृत नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे दीपकने पिट्स्बर्गमधील 'जोन सिंग' नांवाच्या ॲटर्नीमार्फत दाखल केली. 'बृहत् पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळ' (Maharashtra Mandal of Greater Pittsburgh) या अधिकृत नांवाने 'विनानफा तत्त्वावर चालणारी संस्था' म्हणून मंडळाची सरकारदरबारी नोंदणी झाली.

मंडळाचा सचिव म्हणून मी पहिली जवळजवळ पाच वर्षे काम केले. त्या वेळी मंडळाचे वार्तापत्र मी स्वतःच्या अक्षरात लिहून त्याच्या नकला (फोटोकॉपीज्) सगळ्यांना पाठवीत असे. मंडळाचे वार्तापत्र हस्ताक्षरात लिहायचे काम पुढे शुभा जोशी, मंजुश्री पारखे आणि वसुधा धर्माधिकारी यांनी चालवले.

१९८७ साली शिकागोच्या डॉ. हुपरीकरांनी आचार्य अत्रेलिखित 'लग्नाची बेडी' हे नाटक बसवले होते. बाहेरील कलाकारांनी बृहत् पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळात सादर केलेले ते पहिले नाटक होते. त्या नाटकाचा प्रयोग पिट्स्बर्गमधे यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या विष्णु वैद्य आणि शरद गोडबोले या दोन संस्थापकांचा बराच मोठा हातभार लागला होता. त्याचा तपशील विस्तारभयामुळे इथे देता येत नाही.

"आपण एकदा नाटक किंवा निदान एकांकिका तरी बसवूया" असा शुभाताई जोशींनी प्रस्ताव मांडला. दोन एकांकिका बसवल्या गेल्या — पद्माकर डावरे—लिखित 'दादा, भाई नवरोजी' आणि मंगला गोडबोले—लिखित 'एक नवरा झेलू बाई..' श्री. वेंकटेश मंदिराच्या जुन्या सभागृहात दोन्ही एकांकिका सादर केल्या. जुई आणि सायली जोशींनी वेषभूषेचे काम सांभाळले. दोन्ही एकांकिका नंतर क्लीवलंडच्या महाराष्ट्र मंडळात सादर केल्या.

डॉ. निरंजन आणि सौ. सुधा दीक्षित पिट्स्बर्गपासून सुमारे ५० मैल दूरवरच्या युनियनटाउनमधे राहतात. सुधाताईंना मुलांचे कार्यक्रम बसवायची जबरदस्त हौस. त्यांनी स्वतः रचलेल्या आणि बसवलेल्या छोट्या छोट्या नाटिका आणि इतर कार्यक्रम युनियनटाउनमधील व पिट्स्बर्गमधीलही मुलामुलींनी मंडळाच्या दिवाळीच्या कार्यक्रमात मोठ्या धडाडीने सादर केले आहेत.

१९९१-९२ साली मी मंडळाचा अध्यक्ष होतो. वीर सावरकरांच्या चरित्रावर आधारित चित्रपट काढण्यासाठी निधी जमा करण्याच्या हेतूने सुधीर फडके व दोन वाद्यवादक ९२च्या एप्रिलमधे अमेरिकेत येऊन ठिकठिकाणी गीत रामायणाचा कार्यक्रम करणार होते. अमेरिकेतील त्यांचा सगळ्यात पहिला कार्यक्रम बृहत् पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाने आयोजित केला. त्यांच्या कार्यक्रमाची प्रस्तावना म्हणून चारपाच मिनिटे बोलायचे माझे काम होते. "भारतात सिंहस्थ पर्वणी गेल्या आठवड्यात झाली, पण आम्हा पिट्स्बर्गवासींची पर्वणी आज आहे" हे माझ्या भाषणातील पहिले वाक्य बाबूजींना फार आवडले. पिट्स्बर्गमधील दानशूरांनी मुक्तहस्ताने देणग्या दिल्यामुळे त्या एका कार्यक्रमात बाबूजींना दहा हजार डॉलर्सचा निधी मिळाला.

बाबूजींनी त्यांच्या कार्यक्रमाची सुरुवात 'स्वयंवर झाले सीतेचे' या गीताने केली होती. दुसऱ्या दिवशी हिंदु-जैन मंदिरात सण्डे स्कूलचा रामनवमीचा कार्यक्रम होता. आमच्या मराठी बालविहारातील मुलांसाठी मी एक प्रवेश इंग्लिशमधे बसवला होता, तो राम, लक्ष्मण व सीता वनवासात जाण्याच्या प्रसंगावर आधारलेला होता. रामचंद्राला अभिषेक होणार असल्याबद्दल कैकेयीला प्रथम आनंद, नंतर मंथरेने तिचे कान फुंकल्यावर तिच्या मनात माजलेले वादळ आणि शेवटी रामाला वनवासाला पाठवलेच पाहिजे अशी दशरथाकडे मागणी करताना तिचा कठोर निर्धार अशा कैकेयीच्या तीन मानसिक अवस्थांचे चित्रण करण्यासाठी तीन मुलींची योजना केली. त्या सकाळी प्रकाश शेटेबरोबर बाबूजी मंदिरात आले होते. त्यांना या प्रवेशाचे खूप अप्रूप वाटले.

यंदा बाबूजींचे सुपुत्र श्रीधर फडके यांनी 'फिटे अंधाराचे जाळे' हा सुगम संगीताचा कार्यक्रम सादर केला, तेव्हा बाबूजींनी पिट्स्बर्गमधे सादर केलेल्या गीत रामायणाच्या कार्यक्रमाच्या आठवणी श्रीधरजींना ऐकवल्या. श्रीधरजींना धन्य वाटले.

बृहत् पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळ हिंदु-जैन मंदिरात दरवर्षी गणेश चतुर्थी साजरी करीत आहे. काही वर्षे मंडळाने आणखी एक संकल्पना राबवली — आपणही आपल्या घरची गणेशमूर्ती व पूजेची सामुग्री मंदिरात आणून जोशीजी (मंदिरातील प्रमुख गुरुजी) सांगतील त्यानुसार गणेशपूजा करायची. निदान काही वर्षे तरी अनेक कुटुंबांनी या उपक्रमात उत्साहाने भाग

घेतला होता. पुढील पिढीतल्या मुलामुलींना 'आपणसुद्धा देवाची पूजाअर्चा करू शकतो' असा विश्वास वाटावा आणि पूजाअर्चा म्हणजे आपल्याला काहीएक न समजणारी बाब नाही हे पटावे, हा त्यामागील एक हेतु होता. गणेश चतुर्थी साजरी करतेवेळी अथर्वशीर्षाचे सार्वजनिक पारायण करण्याचा उपक्रम गेली दोन वर्षे पार पडला आहे.

गणेशचतुर्थीच्या दिवशी भारतातील किंवा अमेरिकेतील गायक–गायिकांचा कार्यक्रम सादर करण्याची परंपरा बृहत् पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाने अनेक वर्षे चालवली आहे. तसेच इतर प्रसंगीही बाहेरील कलाकारांचे संगीत, नृत्य, नाटक, व्याख्यान, एकपात्री प्रहसन इ. विविध प्रकारचे कार्यक्रम मंडळाने वेळोवेळी सादर केले आहेत. गेली काही वर्षे डॉ. मनोहरांची एकांकिका आणि स्थानिक कलाकारांची नृत्ये व संगीत असा बहारदार 'रंगसंगीत' कार्यक्रम एप्रिल–मेच्या सुमारास सादर केला जाऊ लागला आहे. एखादे तीन अंकी नाटक बसवण्याचा उपक्रम आम्ही पिट्स्बर्गवासींनी अजून करून पाहिलेला नाही.

मंडळाचे सध्याचे अध्यक्ष डॉ. प्रियदर्शन मनोहर यांच्या स्वलिखित एकांकिकांनी मंडळाच्या कार्यक्रमांना विशेष लज्जत आणली आहे. सौ. अनघा मनोहर यांचा अभिनय व दिग्दर्शन आणि डॉ. रत्नाकर मुजुमदार यांचे नेपथ्य यांमुळे ह्या एकांकिका अधिक रसभरित झाल्या आहेत.

गेली अनेक वर्षे भारतीय संगीतकारांना इथे आणून त्यांचे कार्यक्रम उत्तर अमेरिकेत ठिकठिकाणी यशस्वीरीत्या आयोजित केल्यामुळे डॉ. बळवंत दीक्षित यांचे नांव उत्तर अमेरिकेत अनेकांना सुपरिचित आहे. डॉ. रवींद्र गोडसे आणि डॉ. प्रियदर्शन मनोहर या दोघांचीही पुस्तके भारतात प्रकाशित झाली आहेत. डॉ. गोडसे यांनी आजवर तीन चित्रपटांची निर्मिती केली आहे. 'एकता'मधे नेमाने मराठीत लिखाण करणाऱ्यांपैकी मी, डॉ. गोडसे, डॉ. मनोहर आणि श्री. शंतनु भिडे असे आम्ही चारजण पिट्स्बर्गच्या महाराष्ट्र मंडळाचे सदस्य आहोत. एकदा गिरीश गोडबोले बृहत् पिट्स्बर्ग महाराष्ट्र मंडळाचा अध्यक्ष असतांना क्लीवलंडच्या महाराष्ट्र मंडळासमवेत 'ज्योति' नांवाचा दिवाळी विशेषांक आम्ही संयुक्तरीत्या काढला होता.

गेल्या पंचवीस वर्षांमधे बृहत् पिट्स्बर्ग परिसराचा आणि त्याचबरोबर महाराष्ट्र मंडळाचाही बराच कायापालट झाला आहे. मराठी कुटुंबांची संख्या वाढली आहे एवढेच नाही, तर बरेचसे नवे सभासद आता आमच्या पिढीतल्या मंडळींसारखे इथे विद्यार्थी म्हणून आलेले नाहीत. त्यांच्यापैकी बरेचजण इथे हातात नोकरी घेऊनच आले आहेत. आणि त्यांच्या कुटुंबांमधे मराठी व हिंदीचा वापर आमच्या पिढीतील कुटुंबांपेक्षा बराच जास्त आहे. त्यामुळेच की काय, पण एकांकिका, नृत्य व संगीत अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमधे शैशव आणि कौमार्य या अवस्थांतील मुलामुलींचा सहभाग मोठा जबरदस्तही आहे आणि अतिशय वाखाणण्याजोगाही आहे. मंडळाचा प्रत्येक कार्यक्रम पाहतांना नृत्य, संगीत व अभिनय या तिन्ही कलांच्या उपासकांची संख्या बरीच वाढल्याचे तीव्रतेने जाणवते.

जी संघटना उभी करण्यात आपला खारीचाच का होईना, पण काही वाटा होता, ती संघटना आज सुदृढ आणि सुसंपन्न झालेली पाहतांना, हल्लीचे कार्यक्रम पाहतांना आणि विशेषकरून पुढच्या पिढीतील मुलामुलींचे कार्यक्रम पाहतांना आनंदाचे भरते येते आणि नकळत एखादा तरी अश्रु गालावर घरंगळतो.

आपल्या वारसाहक्काची – अर्थात् आपल्या 'मराठीपणा'ची – जाणीव आणि त्याची जोपासना करण्याची तळमळ परदेशी राहणाऱ्या व वाढणाऱ्या प्रत्येक पिढीमधे सदैव जागी राहो, एवढेच आमचे परमेश्वराकडे मागणे आहे. ◆◆◆